जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -३९६ दिनांक - २७/०५/२०२३**

**वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर**

## वाहन चोरटयाकडुन दुचाकी वाहन हस्तगतः

दिनांक १९/०५/२०२३ रोजी वानवडी पोलीस स्टेशन हद्दीत वरिष्ठांचे आदेशाने वाहन चोरी प्रतिबंध करण्यासाठी तपास पथक प्रभारी अधिकारी व पेलीस अंमलदार पेट्रोलिग करीत असताना, रामटेकडी इंडस्ट्रियल एरिया, रेल्वे अंडर बायपास जवळ दुचाकीवरुन जाणारा अनोळखी इसम यास थांबविणेचा इशारा केला असता ,त्यांने त्यांचे वाहन भरधाव गतीने जोरात करुन पळुन जात असताना त्यांचा सिनेस्टाईल पाठलाग करुन इसम नामे दिनेश रघुनाथ शिंदे,वय २८ वर्ष रा मातंग वस्ती,वैदुवाडी हडपसर,पुणे यास ताब्यात घेवुन वानवडी पोस्टे गु र.नं.१२६/२०२३ मध्ये अटक करुन १० दुचाकी जप्त करणेत आलेल्या होत्या सदर नमुद गुन्हयाचे अनुषांगने तपास करीत असताना,आरोपीत यांने खाली नमुद गुन्हयातील दुचाकी चोरी केलेबाबत निष्पन्न झाल्याने त्यास दिनांक २५/०५/२०२३ रोजी अटक करणेत आलेले आहे.

१) वानवडी पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर १०८/२०२२ भा.द.वि.क.३७९

वानवडी पोलीस ठाणे येथील गुन्हा उघडकीस येवुन, आरोपीत यांचे कडुन हिरो होन्डा स्प्लेन्डर प्लस मोटारसायकल किंमत रु १०,०००/- जप्त करणेत आलेली आहे.

सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशीक विभाग, पुणे शहर श्री रंजनकुमार शर्मा, मा. पोलीस उप आयुक्त परि. ५, पुणे शहर श्री विक्रांत देशमुख, व मा.सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग पुणे शहर श्रीमती पौर्णिमा तावरे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री.भाऊसाहेब पटारे,पोलीस निरिक्षक (गुन्हे) संदिप शिवले व तपास पथकातील पोलीस उपनिरिक्षक संतोष सोनवणे, पोलीस अंमलदार रासगे,अमजद पठाण, संतोष नाईक,विनोद भंडलकर ,हरिदास कदम, अतुल गायकवाड, राहुल गोसावी, निलकंठ राठोड, संदिप साळवे विष्णु सुतार, विठ्ठल चोरमले, अमोल गायकवाड व मनिषा सुतार,सोनम भगत यांनी केली आहे.


महाराष्ट्र पोलीस
वानवडी पोलीस ठाणे
पुणे शहर
फोन नं. : ०२०-२६८२४९८१